# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### बडनेरा (जि.अमरावती) येथील कोरोना तपासणी केंद्रामध्ये महिलेची चुकीच्या पध्दतीने कोरोना तपासणी केल्याबाबत

**(१) ४७७६ (२२-११-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा (जि.अमरावती) येथील ट्रामा केअर युनिटमध्ये कोरोना तपासणी केंद्रातील प्रयोगशाळेमध्ये दिनांक २८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास तेथील मॉलमधील कर्मचाऱ्यांसह महिला कर्मचाऱ्यांच्या कोरोना तपासण्या करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील लॅबमधील अल्पेश नावाच्या कर्मचाऱ्यांने एका महिलेची पहिल्यांदा नाकाद्वारे व दुसऱ्यांदा बेकायदेशीरपणे व आक्षेपार्हरित्या तिच्या गुप्तांगातून स्वॅब घेतल्याचा धक्कादायक व संतापजनक प्रकार दिनांक ३० जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास घडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना तपासणी केंद्रातील संतापजनक प्रकाराबाबत तेथील नागरिकांनी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस तपास करण्यात आला आहे काय, पोलीस तपासात काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) होय.

(२) होय. सदर प्रकरणी बडनेरा पोलीस स्टेशन येथे दिनांक २८/०७/२०२० रोजी अप क्र. ४९०/२०२० कलम ३५४, ३७६(c)(d), ३७६(२)(e), भादवि सहकलम ३(१)(w), (३)(२)(५) अ.जा.ज.अ.प्र.का. सहकलम ६७ आय टी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ११/०९/२०२० अन्वये दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते.

(३) सदर संतापजनक प्रकारानंतर एकूण ०३ आरोपी यांनी ट्रामा केअर युनिट मोदी हॉस्पीटल, बडनेरा येथे येवून तोडफोड करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी दिनांक ३०/०७/२०२० रोजी बडनेरा पोलीस स्टेशन येथे अप क्र. ४९४/२०२० कलम ३५३, १८६, ४२७, ३४ भादवि सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(४) उक्त नमूद दोन्ही प्रकरणात गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. अप क्र. ४९०/२०२० प्रकरणामध्ये मा.न्यायालयाने आरोपीस दिनांक ०२/०२/२०२२ रोजी १० वर्ष कारावासाची शिक्षा व रुपये १०,०००/- दंड व दंड न भरल्यास २ महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे. आरोपी सध्या कारागृहात आहे.
अप क्र. ४९४/२०२० मध्ये गुन्ह्याचा तपास पूर्ण करून तपासाअंती गुन्ह्यातील ०३ आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ११/१२/२०२० दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(२) १४२५९ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ११३२१ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मागील ३ वर्षापासून ७ व्या वेतन आयोगापासून वंचित असल्याचे दिनांक २०/४/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना थकबाकीसह ७ वा वेतन लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाची थकबाकीसाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यू रोखण्याबाबत

**(३) १५०५२ (२५-०८-२०२२) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे जानेवारी, २०२१ ते मे, २०२२ या १७ महिन्यांच्या कालावधीत वय वर्षे ० ते ५ वयोगटातील २२ हजार ७५१ बालमृत्यू झाले असल्याचे दिनांक १६ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालमृत्यू संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचेकडून “समर्थन” या सामाजिक संस्थेला माहिती देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालमृत्यू हे कुपोषणामुळे होत असल्याने सदर बालमृत्यू रोखण्याबाबत शासनाने टास्क फोर्स निर्माण करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी अशी मागणी राज्यातील सामाजिक (समर्थन संघटनेसह) संघटनांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे आहे,
(३) हे खरे आहे,
(४) जिल्हा स्तरावर दरमहा घेण्यात येणाऱ्या बालमृत्यू अन्वेषण सभेनुसार राज्यातील बाल मृत्यू हे Sepsis, pneumonia, prematurity & LBW, Sudden Infant Death Congenital malformation, Respiratory distress या वैद्यकीय कारणांमुळे झालेले आहेत. आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत व राष्ट्रीय आरोग्य अभियान (National Health Mission) अंतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात येतात.

१) आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU)
२) नवजात शिशु स्थिरीकरणकक्ष (NBSU)
३) बालउपचारकेंद्र (CTC)
४) पोषणपुनर्वसन केंद्र (NRC)
५) घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC)
६) घरच्या घरी लहान बाळाची काळजी (HBYC)
७) Mother Absolute Affection (MAA)
८) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम
९) ॲनिमियामुक्त भारत
१०) जननी सुरक्षा योजना (JSY)
११) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK)
१२) मानव विकास कार्यक्रम
१३) प्रधान मंत्री मातृवंदना योजना (PMMVY)
१४) प्रधान मंत्री सुरक्षीत मातृत्व अभियान,
१५) नवसंजीवनी योजना.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पदव्युत्तर शिक्षणाच्या बनावट पदव्या विकून विद्यार्थ्यांची आणि शासनाची फसवणूक करणात येत असल्याबाबत

**(४) १५०५६ (२५-०८-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाची कोणतीही मान्यता न घेता अहमदनगर जिल्ह्यातील भारतीय तकनिकी अनुसंधान आणि व्यवसाय प्रबंधन अध्यायन संस्थान हि शैक्षणिक संस्था इंजिनीअरिंग आणि वैद्यकीय प्रवेशाबाबत इंटरनेट, वृत्तपत्रे, फेसबुकवर जाहिराती करून पदव्युत्तर शिक्षणाच्या अनधिकृत बनावट पदव्या विद्यार्थ्यांना विकत असल्याचे दिनांक ४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पदव्युत्तर शिक्षणाच्या बनावट पदव्या विकून विद्यार्थ्यांची आणि शासनाची फसवणूक करणाऱ्या सदरहू संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०६-२०२३) :** (१) होय.

(२) सदर बाब महाराष्ट्र कृषी / पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील कलम ३ चे उल्लंघन करणारी असल्याचे स्पष्ट होते. उपरोक्त अधिनियमातील कलम ६ (१) मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेल्या प्राधिकारांतर्गत कथित विद्यापीठात चालवित असलेले अभ्यासक्रम / पाठ्यक्रम तसेच, उपरोक्त कथित शैक्षणिक संस्था तात्काळ बंद करण्याचे आदेश संचालक, उच्च शिक्षण यांचे स्तरावरुन देण्यात आले आहेत.

तसेच उक्त अधिनियमातील कलम ६(२) अन्वये प्रवेशाच्या प्रयोजनार्थ घेतलेली फी व अन्य रकमा किंवा आकार विद्यार्थ्यांना परत करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सन २०१३ च्या अधिनियमातील कलम ६(३) नुसार अनधिकृत संस्थेबाबत प्रसिध्दी देण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विशेषतः आदिवासी भागात नवसंजीवनी योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याबाबत

**(५) १५०८१ (३१-१०-२०२२) श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः आदिवासी भागातील अर्भक मृत्यू आणि माता मृत्यू कमी करण्यासाठी आदिवासी क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसुत्रता व प्रभावीपणा आणण्याच्या दृष्टीने सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र करुन शासनाने नवसंजीवनी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००८ -२००९ ते २०२१-२२ या १४ वर्षांत ४९ हजार ७०० बालकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नवसंजीवनी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे,

(२) सदर कालावधीत ० ते ६ वर्षापर्यंतच्या ६१०५९ बालकांचा मृत्यू झाला आहे.

(३) नवसंजीवनी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने पुढील कार्यवाही केली आहे.

• आदिवासी भागातील बालमृत्यू टाळण्यासाठी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली गाभा समिती (Core Committee) ची स्थापना करण्यात आली असून या समितीद्वारे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

• जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय गाभा समिती व प्रकल्प अधिकारी आदिवासी विभाग यांचे अध्यक्षतेखाली आदिवासी प्रकल्प गाभा समिती प्रकल्प स्तरावर गठीत करण्यात आलेल्या आहेत.

• राज्यस्तरावरुन जिल्हास्तरीय नवसंजीवनी योजनाचा आढावा घेऊन योग्य ते मार्गदर्शन व उपाययोजना केल्या जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील हतनुर धरणाच्या वाढीव विसर्ग गेटचे बांधकाम गेल्या १२ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत..

**(६) १५२८४ (२८-१२-२०२२) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील हतनुर धरणाच्या वाढीव विसर्ग गेटचे बांधकाम गेल्या १२ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बांधकामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला व हे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या विसर्ग गेटचे बांधकाम त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) होय.

(२) हतनुर धरणाच्या टप्पा - १ अंतर्गत अतिरिक्त ०८ गेटच्या बांधकामावर सन २०२२-२३ मध्ये जानेवारी, २०२३ अखेरीस रुपये ४७.१८ कोटी खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पावर आतापर्यंत एकूण रुपये ३९३ कोटी इतका खर्च झालेला आहे.

हतनुर प्रकल्पाच्या मूळ घटकांशी या नवीन अतिरिक्त ८ वाढीव गेटची सांगड घालून त्यानूसार सुधारित पूर अभ्यासानूसार संकल्पन व रेखाचित्रे तयार करून कामे करणे आवश्यक होते. त्यामुळे विविध स्तरावर संकल्पन व रेखाचित्रे मंजूरी, सुधारीत प्रशासकीय मान्यता तसेच निधीची उपलब्धता नसणे इत्यादी कारणांमुळे सदर प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही.

(३) उर्ध्व तापी टप्पा -१ हतनुर प्रकल्पाच्या वाढीव किंमती व सुधारित दरसुची व अनुषंगिक खर्चामुळे दिनांक ११/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ५३६.०१ कोटी इतक्या किंमतीस चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०२१ पासून निधी उपलब्धतेनूसार व सुधारीत संकल्पन व रेखाचित्रांनूसार बांधकाम सुरु करण्यात आले असून निधीचे उपलब्धतेनुसार सदर काम जून, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील अस्थायी सहायक प्राध्यापक डॉक्टरांना सेवेत कायम करण्याबाबत

**(७) १५५४३ (२८-१२-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा टिकविण्यासाठी वरिष्ठ अध्यापकांची नितांत गरज असल्याने अस्थायी सहायक प्राध्यापक डॉक्टरांना सेवेत कायम करण्याच्या मागणीबाबत महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेने माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक प्राध्यापक संवर्गात रिक्त असलेल्या ८८४ पदांसाठी जाहीरात प्रसिध्द करून पदभरती सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदभरती प्रक्रियेबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अस्थायी सहायक प्राध्यापक डॉक्टरांना शासन सेवेत कायम करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त शिफारशींच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सिने अभिनेत्रीने एका ऑनलाइन मासे विक्रेता कंपनीचे प्रमोशन दरम्यान मुंबईतील मासे विक्रेता महिलांचा अपमान केला असल्याबाबत

**(८) १५५७४ (२८-१२-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिनेअभिनेत्रीने एका ऑनलाइन मासे विक्रेता कंपनीचे जाहिरात करताना मासे विक्रेता कोळी महिला हे ग्राहकांची फसवणूक करत असल्याचा दावा केल्यामुळे मुंबईतील मासे विक्रेता महिलांचा अपमान केला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या ऑनलाइन कंपनीने ही जाहिरात फेसबूकवर प्रदर्शित केली त्या कंपनीविरूध्द पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर कंपनीने आणि सिनेअभिनेत्रीने मच्छिमार मासे विक्रेता कोळी महिलांची सशर्त माफी आणि सदर जाहिरातीवर बंदी घालण्याची मागणी अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनीने आणि सिने अभिनेत्रीने मच्छिमार मासे विक्रेता कोळी महिलांची माफी मागण्याबाबत आणि सदर जाहिरातीवर बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) आणि (२) हे खरे नाही.

सिने अभिनेत्री वर्षा उसगावकरांनी ऑनलाईन मासे विक्रेता कंपनीची जाहिरात केल्यामुळे मुंबईतील मासे विक्रेता महिलांचा अपमान केल्याबाबत व सदरची जाहिरात फेसबुकवर प्रदर्शित केली त्या कंपनीविरुध्द बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील कोणत्याही शाखेत/पोलीस ठाण्यात तक्रार व गुन्हा नोंद नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्हयातील शल्यचिकित्सक व आरोग्य अधिकारी यांच्याकडून वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना हिन वागणूक मिळत असल्याबाबत

**(९) १६१९६ (२८-१२-२०२२) श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी, नंदुरबार यांच्याकडून जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना जाणीवपूर्वक मानसिक त्रास व दडपशाही पध्दतीची वागणूक मिळत असल्याबाबतची तक्रार नंदुरबार जिल्हा महाराष्ट्र राजपत्रित वैद्यकिय अधिकारी संघटना (मॅग्मो) यानी स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी, नंदुरबार यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (११-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, त्यामध्ये जिल्हा शल्य चिकीत्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्याची धारणा झाल्याने तक्रार उद्भवली होती. सद्य:स्थितीत, आरोग्य विभागाचे कामकाज समन्वयाने चालु असून संघटनेचा कोणावरच रोष नाही, असे मॅग्मो संघटनेने दिनांक २८/०२/२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आरोग्य आयुक्तांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या शिस्तीबाबत परिपत्रक काढून सुटीदिवशी विनापरवानगी मुख्यालय न सोडण्याच्या दिलेल्या आदेशाबाबत

**(१०) १६४०२ (२८-१२-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य आयुक्तांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या शिस्तीबाबत एक परिपत्रक काढून सुट्टीच्या दिवशीही विना परवानगी मुख्यालय सोडू नका असे आदेश दिले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागात अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असतानाही हे कर्मचारी ८ तासांपेक्षा जास्त सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणतेही अतिरिक्त मानधन देत नसल्याने सर्व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त पदाचा चार्ज मा.आयुक्तांनी घेतल्यावर राज्यभरातील सर्व गावांमधील प्रलंबित प्राथमिक आरोग्य केंद्र ते मोठ्या रुग्णालयातील सद्यःस्थितीचा कोणता आढावा घेतला आहे काय,

(४) असल्यास, या आढाव्यानुसार राज्यातील जनतेचे आरोग्य सुधारताना आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (०८-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

तथापि, सदर परिपत्रक आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी नसून विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख व इतर अधिकारी यांच्यासाठी निर्गमित करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समस्यांविषयी वेळोवेळी दखल घेऊन उपाययोजना केल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगर क्षेत्राच्या वाहतूक समस्येबाबत

**(११) १६८५० (२८-१२-२०२२) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर क्षेत्राच्या वाहतूक समस्येचे निराकरण करण्यासाठी एक उच्चाधिकार समिती/ तत्सम समिती गठित करण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समितीच्या आतापर्यंत किती बैठका घेण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, सदर समितीने पुणे महानगर क्षेत्राच्या वाहतूक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने आपला अहवाल सादर केला आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहतूक समस्येचे निराकरण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

पुणे महानगर क्षेत्राच्या वाहतूक समस्येचे निराकरण करण्यासाठी पुणे एकिकृत महानगर परिवहन प्राधिकरण समिती दिनांक ०४/०६/२०१९ रोजी गठीत करण्यात आली आहे.
(२) सदर समितीच्या आतापर्यंत एकूण ०९ बैठका घेण्यात आल्या आहेत.
(३) पुणे महानगर क्षेत्राच्या वाहतूक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने पुणे एकिकृत महानगर परिवहन प्राधिकरण समितीमार्फत अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) वाहतूक समस्येचे निराकरण करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- विद्यापीठ चौक येथील मेट्रो बांधकामासाठी फुटपाथ काढून टाकण्यात आले आहेत.
- वाहतूकीचे मार्ग एकेरी करण्यात आले आहेत.
- आवश्यकतेनुसार काही ठिकाणी सिग्नल काढून टाकण्यात आले आहेत तर काही ठिकाणी नव्याने सिग्नल बसविण्यात आले आहेत.
- वेळोवेळी प्रेसनोटद्वारे जनतेला पर्यायी मार्गांबाबतच्या सूचना देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील पुणे-बंगळुर राष्ट्रीय महामार्गावरील खंबाटकी घाटात दोन कंटेनरने पेट घेतला असल्याबाबत

**(१२) १७३१९ (२५-०३-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पुणे-बंगळुर राष्ट्रीय महामार्गावरील खंबाटकी घाटात असलेल्या खामजाई मंदिराजवळ दोन कंटेनरने एकाच वेळी पेट घेतल्याने ७ कि.मी पर्यंतची वाहतूक ठप्प झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, या चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ८ जानेवारी, २०२३ रोजी पुणे-बंगळुर राष्ट्रीय महामार्गावरील खंबाटकी घाटात एका कंटेनर चालकाचा वाहनावरील ताबा सुटून तो कंटेनर पाठीमागे ४० ते ४५ फुट सरकत येऊन दुसऱ्या कंटेनरच्या डिझेलच्या टाकीस घासल्याने टाकी फुटून आग लागली. त्यामुळे दोन्ही वाहनांनी पेट घेतल्यामुळे काही कालावधीकरीता वाहतूक ठप्प झाली होती.

(२) व (३) सदर घटनेच्या अनुषंगाने, खंडाळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.०१/२०२३ भा.द.वि. कलम २७९, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विनाअनुदानित तत्वावरील आय. टी. आय ना अनुदान मिळणेबाबत

**(१३) १७६२२ (२५-०३-२०२३) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदान तत्त्वावरील आय.टी.आय वगळून उर्वरित विद्या शाखांना अनुदान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८-२००९ रोजी पासून आय. टी. आय ना अनुदान देणेबाबत कॅबिनेट नोट तयार झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने प्रस्ताव दोन महिन्यात मंत्रिमंडळासमोर सादर करण्याबाबत आदेश झाला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील विनाअनुदान तत्वावरील आय.टी.आय. ना अनुदान देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०९-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) सदर मागणीच्या अनुषंगाने कौशल्य, विकास व उद्योजकता विभागाव्दारे दिनांक २९ मे, २०१९ च्या शासन निर्णयानुसार व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेस मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेव्दारे आर्थिक दुर्बल घटकातील खुला प्रवर्ग, अनुसूचित जाती व जमाती, इमाव, विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काची रक्कम त्यांच्या उत्पन्नाच्या मर्यादेत प्रशिक्षण शुल्काच्या ८० ते १०० टक्के मर्यादेत रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते.

खाजगी संस्थेत प्रवेश घेण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात येवून खाजगी संस्थांना प्रशिक्षण शुल्काच्या माध्यमातून संस्थेचा खर्च भागविणे शक्य व्हावे असा योजेनचा उद्देश आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही

---

## दुई- सुकळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) शेती शिवारातील कृषी पंपाच्या केबल चोरीच्या घटना घडल्याबाबत

**(१४) १७६४९ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुई- सुकळी (ता.मुक्ताईनगर,जि.जळगाव) शेती शिवारातील कृषी पंपाच्या केबल चोरीच्या अनेक घटना दिनांक ९ सप्टेंबर २०२२ पूर्वी घडल्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणाती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) दुई-सुकळी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव येथे दिनांक ०९/०९/२०२२ रोजी कृषी पंपाच्या केबल चोरीची घटना घडली होती.

(२) कृषी पंपाच्या केबल चोरीबाबत अज्ञात व्यक्तीविरूध्द मुक्ताईनगर पोलीस स्टेशन, जळगाव येथे सी.सी.टी.एन.एस नं.३०९/२०२२ भा.दं.वि कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे दिनांक १०/०९/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यांचा तपास करण्यात आला असून तपासामध्ये गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमाल मिळून न आल्याने मा.न्यायालयात अ वर्ग समरी पाठविण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## शिंदी (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथे पाणी पाणी पुरवठा योजना सुरु झाली नसल्याबाबत

**(१५) १७६५२ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदी (ता.भुसावळ,जि.जळगांव) येथे पाणीपुरवठा योजनेचे काम दिड वर्षापूर्वी पूर्ण होवूनही अद्याप पाणीपुरवठा सुरू झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१८-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे

(२) व (३) होय, योजनेचे काम १००% पूर्ण झालेले असून वीज जोडणी अभावी योजना कार्यान्वित करता आलेली नाही. ग्रामपंचायतीकडे वीज देयकांची मोठ्या प्रमाणात थकबाकी असल्यामुळे वीज मंडळाकडून डिमांडनोट व अंदाजपत्रक अप्राप्त आहे. संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांना थकीत वीज देयकाची रक्कम भरणा करण्याबाबत क्षेत्रिय स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

---

## भुसावळ (जि.जळगाव) शहरातील खडका रोड येथून अवैध तांदळाचा ट्रक जप्त करून संबधितांवर गुन्हा दाखल करणेबाबत

**(१६) १८०११ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरातील खडका रोड येथून दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी रात्री बाजार पेठेत पोलिसांनी अवैध तांदळाचा ट्रक जप्त करून संबंधितांवर गुन्हा दाखल केल्याची घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०२३) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन, जिल्हा जळगाव येथे सीसीटीएनएस क्रमांक ४३४/२०२२, अत्यावश्यक वस्तु अधिनियम ३,७ अन्वये एकूण ०४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून रुपये १५ लाख इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## चितोडा (ता.यावल, जि.जळगाव) येथे उसनवार दिलेले पैसे परत मागण्याचे कारणावरून मनोज संतोष भंगाळे नामक व्यक्तीचा खून झाला असल्याने गुन्हा दाखल होणेबाबत

**(१७) १८०१२ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) चितोडा (ता.यावल,जि.जळगाव) येथे उसनवार दिलेले पैसे परत मागण्याचे कारणावरून मनोज संतोष भंगाळे नामक व्यक्तीचा खून करण्यात आल्याची घटना दिनांक २२/०८/२०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी व्यक्तीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) व (२) होय,

सदर प्रकरणी यावल पोलीस स्टेशन, जळगाव येथे दिनांक २२/०८/२०२२ रोजी गु.र.नं.०३९६/२०२२ भा.दं.वि कलम ३०२, ३४, १२० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील तीन आरोपींना दिनांक २२/०८/२०२२ रोजी व एका आरोपीस दिनांक २४/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक ०२/०९/२०२२ पासून चारही आरोपींना मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांड, सब जेल, जळगाव येथे ठेवण्यात आले आहे. सदर आरोपींवर दिनांक १९/११/२०२२ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे बेकायदेशीर बायोडीझेलचा सुमारे २० लाखांचा अवैध साठा जप्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होणेबाबत

**(१८) १८०१६ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे बेकायदेशीर बायोडीझेलचा सुमारे २० लाखांचा अवैध साठा जप्त झाल्याची घटना दिनांक २९/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत पोलीस प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी प्रभारी पुरवठा अधिकारी, भूसावळ तहसिल कार्यालय, जि.जळगाव यांच्या फिर्यादीनूसार वरणगाव पोलीस स्टेशन, जि.जळगाव येथे दिनांक २७/१०/२०२१ रोजी गु.र.नं. १८६/२०२१ अन्वये अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ चे कलम ३,७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आले असून दिनांक २८/१२/२०२२ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील किन्हीराजा येथील आरोग्यवर्धिनी केंद्रात कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया सुरू असतानाच अचानक वीज पुरवठा खंडीत झाल्याबाबत

**(१९) १८१५५ (२५-०३-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील किन्हीराजा येथील आरोग्यवर्धिनी केंद्रात कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया सुरू असतानाच अचानक वीज पुरवठा खंडीत होवूनही बॅटरीच्या प्रकाशाखाली यशस्वीपणे शस्त्रक्रिया केली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर आरोग्यवर्धिनी क्रेंद्रात मोठ्या प्रमाणात कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया केल्या जात असून नियोजनाअभावी रुग्णांचा जीव धोक्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून रुग्णालय प्रशासनाने पर्यायी विजेची व्यवस्था केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात जनरेटरची, पाण्याची सोय नसून स्वच्छतेचा अभाव असल्याच्या बाबीही निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने तसेच उक्त आरोग्य केंद्रात पर्यायी विजेची व्यवस्था व इतर सोयीसुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०६-२०२३) : (**१)  हे, अंशतः खरे आहे.
वाशिम जिल्ह्यातील किन्हीराजा येथील आरोग्यवर्धिनी प्रा.आ. केंद्रात दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी आयोजित केलेल्या सत्रातील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रुग्णाची ड्रेसिंग चालू असताना ०२ ते ०३ मिनिटांसाठी वीज पुरवठा खंडित झाला व या कालावधीत बॅटरीच्या प्रकाशात रुग्णांची ड्रेसिंग करण्यात आली.
(२) होय, हे खरे आहे.

विद्युत पुरवठा अंदाजे ०२ ते ०३ मिनिटांसाठी खंडीत झाला होता. पर्यायी व्यवस्था जनरेटर स्वरुपात उपलब्ध होती, मात्र ते दुरुस्ती अभावी बंद होते.

तसेच सदर सत्रामध्ये करण्यात आलेल्या एकूण १८ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांपैकी कोणत्याही लाभार्थ्यांना कोणतीही गुंतागुंत झाली नसून त्यांना सुखरुप घरी सोडण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.

किन्हीराजा आरोग्यवर्धिनी केंद्रात पाण्याची सोय असून, स्वच्छतेचा अभाव नाही. तसेच पर्यायी विजेसाठी जनरेटरची व्यवस्था आहे. परंतु सदर जनरेटर किरकोळ दुरुस्ती अभावी त्यादिवशी बंद होते व ते आता दुरुस्त करण्यात आलेले आहे.
(४) पर्यायी विजेसाठी जनरेटरची दुरुस्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत जनरेटर सुरु आहे. सदर प्रकरणी चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आलेली असून, किन्हीराजा आरोग्यवर्धिनी केंद्राच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना दिनांक १ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मांजरा धरण (जि.बीड) प्रकल्पाचे व्यवस्थापन कामकाजासाठी २२ पदे मंजूर करण्याबाबत

**(२०) १८५४२ (२५-०३-२०२३) श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १६५५५ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर, उस्मानाबाद व बीड येथील मांजरा धरण प्रकल्पाच्या कामासाठी शासनाने २२ पदे मंजूर केली असून ती केवळ कागदोपत्रीच असल्याने मागील आठ-दहा वर्षापासून त्या ठिकाणी कायमस्वरुपी शाखा अभियंता नसल्यामुळे व्यवस्थापनाचे काम अन्य अधिकाऱ्यांना सांभाळावा लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे धरणाच्या व्यवस्थापनासह सिंचनाचे नियोजनावर देखील त्याचा परिणाम होत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पाणी मिळण्यापासून वंचित रहावे लागत असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने कागदोपत्री नियुक्त्यांबाबत व कायमस्वरुपी शाखा अभियंताप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे. मंजूर पदांपेक्षा कमी संख्येने कर्मचारी कार्यरत आहेत. तथापि, अन्य कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रकल्पातील पाणीसाठ्याचे नियोजन करुन पाणी आवर्तन सुरळीतपणे राबविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

(३) व (४) मांजरा धरण प्रकल्पासाठी कनिष्ठ अभियंता संवर्गाचे पद मंजूर असून या संवर्गाचे रिक्त पद भरण्याची कार्यवाही दिनांक २८/०३/२०२३ च्या आदेशानुसार पदोन्नतीने भरण्यात आले आहे. तसेच गट “क” संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी मुख्य अभियंता, कोकण प्रदेश यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समितीची स्थापना केलेली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.